## फारूक सत्तार उमर भाय हायस्कूल फॉर बॉइज़

## सहामाही परीक्षा ऑक्टोबर २०२३

विषय: मराठी | इयत्ता: आठवी | गुण: २५

दिनांक: 26/10/23 | वेळ:१ तास

प्र. 1. उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती सोडवा.

एका गावात एक खूप श्रीमंत माणूस राहत होता. त्याचं नाव होतं गणेशराव. खूप जमीन जुमला–शेतीवाडी होती त्यांची. शिवाय दोन–तीन दुकानंही; पण एवढी श्रीमंती असूनही गणेशरावांना गर्व नव्हता, कारण त्यांनी हे सगळं खूप कष्ट करून, मेहनत करून कमावलं होतं. त्यांना दोन मुले होती. एक होता खूपच आळशी. सकाळी उशिरा उठायचं. त्यानंतरही मस्त लोळायचं. भूक लागली की जेवायचं. काम करायचा तर त्याला भयंकर कंटाळा. या आळशी मुलाचं नाव होतं अवी. त्याचा भाऊ रवी. त्याचा स्वभाव मात्र अवीच्या अगदी विरूद्ध. सकाळी लवकर उठून तो व्यायाम करायचा. अभ्यास करायचा. वडिलांना त्यांच्या कामात मदत करायचा.

{अ} आकृती पूर्ण करा – 2

i) गानेशारावांकडे असलेली धनदौलत → [ ] [ ]

ii) रवीचा स्वभाव → [ ] [ ] [ ] [ ] 4

{आ} चौकट पूर्ण करा – 2

i) गानेशरावांना हे नव्हता – [ ]

ii) श्रीमंत माणसाचे नाव– [ ]

प्र. 2. पुढील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.

{अ}चौकट पूर्ण करा. 3

i) स्वत:चे कपाळ – [ ]

ii) सागराला अर्पण करायचा नारळ – [ ]

iii) होडी हे मारून चालते – [ ]

| | |
|---|---|
| मी कोळ्याची गं बाई कोळ्याची पोर<br>कपाळावर माझ्या चंद्राची कोर<br>गं बाई मी कोळ्याची पोर ।। धृ . ।।<br>दर्याला रं आलं तुफान<br>पाहून गं होते बेभान<br>तुफानी दर्याची उसळत्या लाटांची<br>नाही हो मला कसलीच डर ।। १ ।। | होरी चालवते वल्ही मारूनी<br>पुढे नेते मी लाटा सारूनी<br>टाकुनी फासे विकुनी मासे<br>संसार चाले हा दर्यावर ।। २ ।।<br>सोन्याच्या मढवुनी नारळाला<br>बाई अर्पण करते सागराला<br>कोळीवाडा उजळे पुनवेला<br>पूजा सागराची चाले जीवनभर ।। ३ ।। |

{आ} ' कोळीवाडा उजळे पुनवेला ' या ओळीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा. 2

प्र. 3.{अ} वाक्प्रचार व त्यांच्या जोड्या लावा. 2

| वाक्प्रचार | अर्थ |
|---|---|
| i)खजील होणे | – विजय मिळवणे |
| ii) मात करणे | – छाप पडणे |
| | – लज्जित होणे |

{आ} खालील वाक्यांचे काळ ओळखा. 2

i) एका गावात एक खूप श्रीमंत माणूस राहत होता.

ii) माझी शाळा खूप सुंदर आहे.

{इ} खालील नावासमोर चिन्ह लिहा. 2

i) स्वल्पविराम – [ ]

ii) पूर्णविराम – [ ]

{ई} वचन बदला. 2

i) दुकान :

ii) गोष्ट :

प्र.4. खालील एका विषयावर निबंध लिहा. 4

i) माझा गाव

ii) माझी शाळा